दैनिक
मुक्तागिरी

दैनिक
मुक्तागिरी





# नमस्ते सातारा

# वीरगाथा ५.0 मध्ये पाटणची श्रावणी चमकली राष्ट्रीय स्तरावर व्दितीय स्थानी

## ही फक्त पाटण व साताऱ्यासाठीच नव्हे तर महाराष्ट्रासाठी गौरवाची गोष्ट

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**पाटण, दि. १३ :** वीरगाथा ५.0 शौर्यपुरस्कार २०२४ या राष्ट्रीय उपक्रमात पाटण तालुक्यातील श्रावणी शेखर संकपाळ, शाळा- शिवांजली शिक्षण संस्थेचे इंग्लिश मिडीयम स्कूल, नाडे ही इयत्ता सहावीची विद्यार्थिनी, सहावी ते आठवी गटात देशपातळीवर द्वितीय स्थानी चमकली.केंद्रीय संरक्षण मंत्रालय व शिक्षण मंत्रालय द्वारे,आयोजित वीरगाथा ५.0 या केंद्रसरकारच्या प्रकल्पात संपूर्ण देशभरातून व विदेशातूनही सुमारे १.९२ कोटी विदयार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. कोट्यावधी मुलांमधून केवळ १00 गुणवंत विद्यार्थ्यांची राष्ट्रीय विजेते म्हणून निवड करण्यात आली.

सशस्त्र दलातील अधिकार्यांच्या शौर्य व बलिदानाच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी तसेच शूरांच्या प्रेरक जीवनकथा रुजवण्यासाठी वीरगाथा प्रकल्पाचे आयोजन केले जाते.

यंदा या प्रकल्पाचे पाचवे वर्ष. श्रावणीने देशपातळीवर इयत्ता सहावी ते आठवी गटात निवडल्या गेलेल्या २५ विद्याथ्यर्थ्यांमध्ये देशात व्दितीय क्रमांक पटकावला. ही फक्त पाटण व साताऱ्यासाठीच नव्हे तर



महाराष्ट्रासाठी गौरवाची गोष्ट आहे असे पाटणच्या गटशिक्षणाधिकारी मा.दीपा बोरकर मॅडम म्हणाल्या.

दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी संरक्षण राज्यमंत्री, शिक्षण राज्यमंत्री, भूदल, नौदल वायुदलाचे प्रमुख अधिकारी यांच्या हस्ते श्रावणीला शौर्य पुरस्कार सुवर्णपदक, प्रमाणपत्र व दहा हजार रुपये रोख पारितोषिक प्रदान करण्यातआले. विशेष अतिथी म्हणून राजपथावरील संचलन सोहळ्यात पाटण्याचा सन्मान मिळाला. तिच्या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक व साहित्यिक गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाला आहे.मी लिहीलेल्या कवितेमुळे मी माझ्या आयुष्यातील पहिला विमान प्रवास माझ्या पालकांसोबत करू शकले, याचे देशातील विविध खाद्यपदार्थ प्रत्यक्ष चाखले, याचे कुतूहल वाटले शौर्यपदक स्विकारताना व राजपथावरील संचलन अतिथी म्हणून सहभागी होताना मन भरून आले. पुढे उच्चशिक्षण घेऊन यश संपादन करायचे आहे असे श्रावणीने मनोगतात सांगितले.श्रावणीला शाळेचे मुख्याध्यापक सचिन यादव सर, शाळेतील सर्व शिक्षक व तिचे पालक यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तिचे गट शिक्षणाधिकारी दीपा बोरकर बोरकर, विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख, शिवांजली. शिक्षणसंस्थेचे संस्थापक दादासाहेब माथणे, सयाजी माथणे, शोभा देवकर सर्व संस्था सदस्य, सरपंच, उपसरपंच सदस्य नाडे, विविध संस्थांचे पदाधिकारी, पत्रकार, तसेच पाटण तालुक्यातील सर्व शिक्षकांनी कौतुक केले.


Powered By Thoughtpad Infotech